सकाळ
कोल्हापूर, सोमवार, १८ मार्च, २०२४

# डॉ. दीपक तुपे यांच्या संशोधन प्रकल्पासाठी अनुदान मंजूर

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक रामा तुपे यांना नवी दिल्लीतील भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषदेने 'अहिंदी भाषी क्षेत्र में हिंदी भाषा का विकास: समस्या एवं समाधान' विषयाच्या संशोधन प्रकल्पासाठी पाच लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. तुपे यांना सन्मानित केले. डॉ. तुपे यांना १५ वर्षे अध्यापनाचा, तर १२ वर्षे संशोधनाचा अनुभव आहे. त्यांनी आजपर्यंत १५५ राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये शोध निबंधांचे वाचन केले आहे. त्यांचे ६३ संशोधन आलेख राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पत्रिकेत प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी त्यांनी 'वर्तमान संदर्भ में हिंदी भाषा का रोजगारोन्मुख पक्ष' या विषयावर लघु शोध प्रकल्प पूर्ण केला आहे. त्यांचे हिंदी भाषा और सूचना प्रौद्योगिकी विषयावर पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्यांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्या शुभांगी गावडे, कौतुभ गावडे, डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

18/03/24

18/3/24